सिंधुदुर्ग, शुक्रवार, २२ जुलै २०२२ शहर-जिल्हा पुढारी

## हळबे महाविद्यालयात मुलींसाठी आरोग्यविषयी मार्गदर्शन

**दोडामार्ग :** कोकणात वातावरण दमट असल्यामुळे व आपल्या आहारात योग्य पदार्थांचा वापर न केल्याने येथील मुला-मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण खूपच कमी आहे. जंक फूड वापर, बदलती जीवनशैली, आहारात जीवनसत्व नसलेल्या पदार्थांचा वापर यामुळे हे प्रमाण घटत चालले आहे. हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी नियमितपणे पालेभाज्या व फळांचा संतुलित आहार घेणे आवश्यक असल्याचे मत समाजसेविका व डॉ. योजना मोरजकर यांनी व्यक्त केले. लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'किशोरवयीन मुलांचे हिमोग्लोबिन कमी कारणे व उपाय' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते.